आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता

२ जून २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- अरुणाचल प्रदेशात भाजपाला पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत, तर सिक्कीममध्ये सत्ताधारी सिक्किम क्रांतीकारी मोर्चा पूर्ण बहुमतासह सत्तेत

- देशातल्या उष्णतेच्या लाटेमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा प्रधानमंत्र्यांकडून आढावा, कुठंही आग लागू नये यासाठी नियमित काळजी घेण्याच्या सूचना

- तैवान एथलटिक्स खुल्या स्पर्धेत ८०० मीटर शर्यतीत भारताच्या अंकेश चौधरीची सुवर्णपदकाला गवसणी, तर सोमनाथ चौहानला रौप्य पदक

**आणि**

- भारताचा बुद्धीबळपटू ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदला जागतिक क्रमवारीत अव्वल दहामध्ये स्थान

<><><><><>

अरुणाचल प्रदेश आणि सिक्किम विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज पार पडली. अरुणाचल प्रदेशात भाजपानं पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत मिळवलं, तर सिक्कीममध्ये सत्ताधारी सिक्किम क्रांतीकारी मोर्चा पूर्ण बहुमतासह सत्तेत परतला आहे.

सिक्किमध्ये ३२ पैकी ३१ जागांवर सिक्किम क्रांतीकारी मोर्चाचे उमेदवार निवडून आले तर एका जागेवर सिक्किम डेमोक्रॅटिक फ्रंटचा उमेदवार जिंकला.

अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपानं ६० पैकी ४६ जागा जिंकल्या, नॅशनल पीपल्स पार्टीनं ५, राष्ट्रवादी काँग्रेस आणि अपक्षांनी प्रत्येकी ३, काँग्रेसनं एक आणि पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचलनं २ जागा जिंकल्या आहेत.

अरुणाचल प्रदेशातल्या मतदारांनी विकासाच्या राजकारणाला कौल दिल्याचं म्हणत, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तिथल्या मतदारांचे आभार मानले आहेत. सिक्कीममधे सिक्कीम क्रांतीकारी मोर्चानं मिळवलेल्या विजयाबद्दल प्रधानमंत्र्यांनी सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमंग यांचं अभिनंदन केलं आहे.

अरुणाचल प्रदेशात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तीन उमेदवार निवडून आले होते. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी समाधान व्यक्त करुन विजयी उमेदवारांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेशाचे मुख्यमंत्री प्रेमा खंडू यांनी आज राज्यपालांची भेट घेऊन मुख्यमंत्रीपदाचा तसंच मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. राज्यपालांनी त्यांचा राजीनामा स्विकारला आणि नव्या सरकारचा शपथविधी होईपर्यंत, खंडू यांनी मुख्यमंत्री म्हणून, तसंच त्यांच्या मंत्रीमंडळानंही कामकाज पहावं अशी विनंती त्यांना केली.

**<><><><><>**

देशातल्या उष्णतेच्या लाटेमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रधानमंत्री मोदी यांनी आज एक बैठक घेतली. बैठकीत त्यांनी हवामान विभागाच्या अंदाजाची माहिती घेतली. या अंदाजानुसार राजस्थान, गुजरात आणि मध्यप्रदेशात उष्णतेच्या लाटेचा परिणाम यापुढेही जाणवत राहणार आहे. या भागात कुठंही आग लागू नये यासाठी नियमित काळजी घेण्याच्या सूचना यावेळी प्रधानमंत्र्यांनी दिल्या.

रेमल चक्रीवादळामुळे उद्भवलेल्या परिस्थितीबाबतही प्रधानमंत्र्यांनी आज नवी दिल्लीत आढावा बैठक घेतली. या बैठकीत, मिझोराम, आसाम, मणिपूर, मेघालय आणि त्रिपुरामध्ये आलेल्या चक्रीवादळाची प्रभावाची माहिती त्यांना

देण्यात आली. त्यावर चर्चा झाली. चक्रीवादळाचा फटका बसलेल्या राज्यांना सरकार पूर्ण मदत करेल अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली. परिस्थितीवर लक्ष ठेवण्याच्या, तसंच स्थिती पूर्ववत करण्यासाठी आवश्यक मदत देण्याकरता नियमितपणे आढावा घेण्याच्या सूचना त्यांनी गृहमंत्रालयाला दिल्या.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यात काल ६२ पूर्णांक ३६ शतांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली. सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ५७ मतदारसंघामध्ये मतदान झालं.

बिहारमध्ये- ५१ पूर्णांक ९२ शतांश टक्के

हिमाचल प्रदेश- ७० पूर्णांक पाच शतांश

झारखंड- ७० पूर्णांक ६६ शतांश,

पंजाब- ६१ पूर्णांक ३२ शतांश,

उत्तर प्रदेश- ५५ पूर्णांक ५९ शतांश,

पश्चिम बंगाल- ७३ पूर्णांक ७९शतांश,

ओदिशा- ७० पूर्णांक ६८ शतांश,

तर चंडीगडमध्ये ६७ पूर्णांक ९ दशांश टक्के इतक्या मतदानाची नोंद झाली.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या मतदानाची प्रक्रीया काल संपल्यानंतर विविध वृत्तसंस्था आणि अन्य संस्थांनी एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर कल चाचणीचे आकडे प्रसिद्ध केले आहेत. भाजपाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी, लोकसभा निवडणुकीत सत्ता टिकवून ठेवणार असल्याचं, बहुतांश अंदाजांमध्ये

दिसून येत आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत मिळालं तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन करता येईल.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक खाजगी वृत्तवाहिन्यांनी वर्तवलेले निकालांचे अंदाज काँग्रेसनं फेटाळले असून हे अंदाज बोगस असल्याचं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, यांनी आज पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांची बैठक घेतली. दूरस्थ पद्धतीनं झालेल्या या बैठकीत पक्षाचे सरचिटणीस के सी वेणुगोपाल, ज्येष्ठ नेते राहुल गांधी, तसंच निवडणूक लढवणारे सर्व उमेदवार आणि प्रदेश काँग्रेस समित्यांचे अध्यक्ष सहभागी झाले होते.

**<><><><><>**

आम आदमी पक्षाचे नेते आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज त्यांच्या हंगामी जामिनाची मुदत संपल्यानंतर तिहार तुरुंगात शरणागती पत्करली. त्याआधी केजरीवाल यांनी पक्षाचे नेते, कार्यकर्ते आणि जनतेशी संवाद साधला. माध्यमांनी मांडलेले लोकसभा निवडणुकीचे मतदानोत्तर कल चाचणीचे निकाल फेटाळून लावत, इंडिया आघाडीचा विजय होईल असा दावा त्यांनी केला. मतमोजणीच्या दिवशी इंडिया आघाडीच्या सर्व मतमोजणी प्रतिनिधींना सतर्क राहण्याचं, आणि मतमोजणी संपेपर्यंत जागा न सोडण्याचं आवाहन त्यांनी केलं.

दरम्यान, भाजपानं आज केजरीवाल यांच्याविरोधात राजघाटासमोर निदर्शनं केली. केजरीवाल यांनी आपल्या शरणागतीचं रूपांतर राजकीय रॅलीत केल्याचा

आरोप भाजपाचे दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी केला. यानंतर पोलिसांनी सचदेवा यांच्यासह अनेक आंदोलकांना अटक केली आहे.

**<><><><><>**

पुण्यातल्या कल्याणी नगर पोर्शे कार अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे आई वडील शिवानी अगरवाल आणि विशाल अगरवाल यांना न्यायालयानं ५ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. रक्ताच्या नमुन्यात फेरफार करून पुराव्यांमध्ये छेडछाड केल्याप्रकरणी शिवानी अगरवालला, तर पोलीस कामात अडथळा आणला म्हणून विशाल अगरवाल याला अटक केली आहे, असं पोलीस सहाय्यक आयुक्त सुनील तांबे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

तैवान एथलटिक्स खुल्या स्पर्धेत ८०० मीटर शर्यतीत भारताच्या अंकेश चौधरीनं सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. तर सोमनाथ चौहाननं रौप्य पदक पटकावलं आहे. अंकेशनं १ मिनिट ५० पूर्णांक ६३ सेकंदात आठशे मीटरचं अंतर पूर्ण केलं. तर सोमनाथला हे अंतर पार करण्यास १ मिनिट ५० पूर्णांक ८८ सेकंद इतका वेळ लागला.

**<><><><><>**

भारताचा मुष्टीयोद्धा अमित पांगाल याचा पॅरिस ऑलिम्पिकमधला प्रवेश आज निश्चित झाला. अमित पांगलनं पॅरिस ऑलिम्पिक प्रवेशासाठी बँकॉकमध्ये सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध पात्रता स्पर्धेत पुरुषांच्या ५१ किलो वजनी गटात, चीनच्या लियू चुआंग याच्यावर ५ - ० अशी मात केली. यामुळे निशांत देव, निकहत झरीन, प्रीती पवार, लवलीना बोरगोहेन यांच्यानंतर पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरलेला अमित हा पाचवा भारतीय मुष्टीयोद्धा ठरला आहे.

**<><><><><>**

भारताचा बुद्धीबळपटू ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद यानं जागतिक क्रमवारीत अव्वल दहामध्ये प्रवेश केला आहे. प्रज्ञानंद यानं नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या पाचव्या फेरीत, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनाचा याचा पराभव केला. या स्पर्धेत प्रज्ञानंद साडेआठ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे, नॉर्वेचा मॅग्नस कार्लसन्स दुसऱ्या, तर अमेरिकेचा हिकारू नाकामुरा १० गुणांसह अव्वल स्थानावर आहे.

स्पर्धेच्या महिला गटात भारताच्या आर वैशाली हीनं चीनची टिंगकी लेईचा हिचा पराभव केला. ती दहा गुणांसह आघाडीवर आहे.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत, आज सह-यजमान अमेरिकेनं विजयी सलामी दिली. अमेरिकेत दलास इथं अमेरिका आणि कॅनडा यांच्यात झालेला, स्पर्धेचा सलामीचा सामना अमेरिकेनं ७ गडी राखून जिंकला. या सामन्यात अमेरिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर कॅनडानं नवनीत धालीवाल आणि निकोलस कर्टन यांच्या अर्धशतकी खेळींच्या जोरावर निर्धारीत २० षटकांत ५ बाद १९४ धावा केल्या. विजयासाठीचं १९५ धावांचं आव्हान अमेरिकेनं १७ षटकं आणि ४ चेंडूतच, केवळ ३ गड्यांच्या मोबदल्यात पार केलं. अमेरिकेच्या अँड्रिस यानं ६५ तर एरॉन जोन्स यानं नाबाद ९४ धावा केल्या.

या स्पर्धेतला दुसरा सामना आज गयाना इथं यजमान वेस्ट इंडिज आणि पापुआ न्यू गिनी यांच्यात सुरु आहे. वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

स्पर्धेतला भारताचा सलामीचा सामना ५ जूनला आयर्लंडसोबत होणार आहे.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीत सध्या सुरू असलेली पाणी टंचाई लक्षात घेऊन, हरयाणा आणि उत्तर प्रदेश सरकारनं किमान महिनाभर दिल्लीसाठी जादा पाणी सोडावं अशी विनंती दिल्लीच्या जलमंत्री आतिशी यांनी  केली आहे. याबाबत त्यांनी दोन्ही राज्य सरकारांना पत्र लिहीलं आहे. दोन्ही राज्यांनी पावसाळा येईपर्यंत अतिरिक्त पाणी दिलं तर नागरिकांना दिलासा मिळू शकेल असं त्यांनी या पत्रात म्हटलं आहे.

दरम्यान दिल्ली राज्य सरकारनं राजकीय हेतूनं ही पत्र लिहिल्याचा आरोप भाजपानं केला आहे. दिल्लीत पाण्याची कमतरता नाही, दिल्लीला शेजारच्या राज्यांमधून दररोज अतिरिक्त पाणी मिळतं, पाण्याच्या टंचाईवर मात करण्यासाठी दिल्ली सरकारनं जलस्त्रोतांची स्वच्छता, तसंचपाणी चोरी आणि गळती रोखण्यावर लक्ष द्यावं असं भाजपाचे दिल्लीचे प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी १५० जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून बोलणं केल्याच्या आरोपाबद्दल काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी आज संध्याकाळी सात वाजेपर्यंत, सवीस्तर तपशील द्यावेत असे निर्देश भारत निवडणूक आयोगानं दिले आहेत. यासंदर्भात आयोगानं जयराम रमेश यांना पत्र पाठवलं आहे. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीच्या काळात सर्व अधिकारी थेट निवडणूक आयोगाच्या अधीन आहेत, मात्र जयराम रमेश यांनी केलेल्या आरोपाप्रमाणे काहीही घडलं असल्याबद्दल कोणत्याही अधिकाऱ्याने कळवलेलं नाही, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. जयराम रमेश यांच्या जाहीर विधानांमुळे संशयाचं वातावरण निर्माण होतं, अशावेळी व्यापक जनहिताचा

मुद्दा म्हणून त्यांनी केलेल्या आरोपांना गांभीर्यानं घेत परिस्थिती स्पष्ट करणं गरजेचं असल्याचंही आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

तेलंगणामध्ये विधानपरिषदेच्या एका जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भारत राष्ट्र समितीने विजय मिळवला आहे. मेहबुबनगर स्थानिक स्वराज्य मतदारसंघासाठी ही निवडणूक झाली होती. यात बीआरएसच्या नवीन कुमार रेड्डी यांनी काँग्रेसच्या मान्न जीवन रेड्डी यांचा अवघ्या १०८ मतांनी पराभव केला. बीआरएसचे विधान परिषद सदस्य कासीरेड्डी नारायण रेड्डी यांनी मागच्या वर्षी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे ही जागा रिक्त झाली होती.

**<><><><><>**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या 'द प्रॉब्लम ऑफ रूपी' या प्रबंधाच्या शंभरी निमित्त मराठी अर्थशास्त्र परिषद महाराष्ट्र आणि सायास सहकारी संस्था यांच्या वतीनं लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स इथं येत्या ११ तारखेला परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या शंभर वर्षातल्या आर्थिक प्रश्नांचा इतिहास, वर्तमान, आणि भूगोल यांचा आढावा घेऊन पुढच्या शंभर वर्षाकरता विचार करण्याच्या उद्देशानं या परिषदेचं आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचं काम पूर्ण झाल्यानं भाविकांसाठी आजपासून विठ्ठल- रुक्मिणीचं पद स्पर्श दर्शन सुरु करण्यात आलं आहे. या निमित्तानं मंदिरात आकर्षक अशी फुलांची आरास करण्यात आली आहे.

**//<><><><><>//**